# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी-९, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. २६४७ २१३१ / २६४७ ४२११

जा.क्र. : काऔसंवि/अ/१०८२१ दिनांक : ३ एप्रिल, २००८

## परिपत्रक

विषय : महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना विमा योजना अंतर्गत गट विमा योजना (जीवन योजना), अपघात विमा योजना व मेडिक्लेम विमा योजना लागू करणेबाबत.

*************

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांना विमा योजना अंतर्गत गट विमा योजना (जीवन योजना), अपघात विमा योजना व मेडिक्लेम विमा योजना लागू करणेबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी महावितरण कंपनीतील कार्यरत कर्मचारी संघटना प्रतिनिधींबरोबर दि. २९ मार्च २००८ रोजी बैठक झाली. या बैठकीत सर्वसाधारण आदेश क्र. २० दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार अस्तित्वात असलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना, कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना कर्मचारी कल्याण निधीमार्फत देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व कामावर असताना अपघात झाल्यास कर्मचाऱ्याला देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इत्यादीबाबत चर्चा झाली आणि सध्या अस्तित्वात असलेल्या योजनेपेक्षा गट विमा योजना (जीवन योजना), अपघात विमा योजना व मेडिक्लेम विमा योजना जास्त फायदेशीर असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे प्रस्तावित खालील विमा योजना कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याचे ठरले. त्याप्रमाणे सदरहू विमा योजनेची वैशिष्ट्ये व तपशील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

**अ) गट विमा योजना (जीवन विमा) :**

१) कर्मचाऱ्याला विमा उतरविण्यासाठी त्याची वयोमर्यादा कमाल ५९ वर्षापेक्षा जास्त असू नये. कर्मचाऱ्याच्यां सेवा निवृत्तीनंतर त्याने नियमितपणे विम्याचा हप्ता भरण्याच्या अटीवर सदर विमा योजना वयाच्या ७० वर्षापर्यंत चालू राहील.

२) विम्याची रक्कम रु. २,००,०००/- (रु.दोन लाख फक्त) इतकी राहील.

३) विमा पॉलिसी कालावधी १० वर्षाचा राहील.

४) विम्याचा हप्ता प्रतिवर्षी अंदाजे रु. १६००/- इतका राहील.

५) कंपनीच्या सेवेत नव्याने रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुद्धा ही योजना लागू राहील.

६) विम्या हप्त्यापोटी भरलेली रक्कम ना परताव्याची राहील.

**फायदे :**

१) कर्मचाऱ्याचा नैसर्गिक / अपघाती मृत्यु झाल्यास या योजनेचा लाभ लागू राहील.
२) विमा पॉलिसी उतरल्यापासून एक वर्षाच्या आत आत्महत्या केल्यास पॉलिसीधारकाला या योजनेचा लाभ मिळणार नाही.
३) विमा हप्तेच्या रकमेवर आयकरावर सूट
४) तुलनात्मकदृष्ट्या विम्या हप्त्याची रक्कम अत्यंत कमी राहील.
५) एक खिडकी योजनांतर्गत विम्याचा दावा निकाली काढला जाईल.

**ब) अपघाती विमा योजना :**

१) विम्याचा हप्ता संपूर्णपणे भरण्याची जबाबदारी कंपनीवर राहील.
२) या पॉलिसीचा गट विमा पॉलिसीशी कोणताही संबंध नाही व अपघातात निधन पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना रु. २००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) गट विमा व अपघाती विम्याचे असे एकूण रु. ४००,०००/- (अक्षरी रु. चार लाख फक्त) मिळतील.

**फायदे :**

१) कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यु झाल्यास रु. २,००,०००/- इतकी रक्कम दिली जाईल. (कामगार नुकसानभरपाई कायद्यांतर्गत मिळणारी भरपाई वगळून)
२) कामावर असताना कायमचे अपंगत्व आल्यास त्याप्रमाणात भरपाई मिळेल. उदा ५० % अपंगत्व आल्यास रु. १,००,०००/- मिळतील.

**क) मेडिक्लेम विमा :**

१) विमा पॉलिसीची रक्कम प्रतिवर्षी रुपये २,००,०००/- इतकी राहील.
२) विमा हप्त्याची रक्कम सर्वसाधारण ६० % पेक्षाही कमी दराने राहील.
३) विमा पॉलिसी कालावधी एक वर्षाचा राहील.
४) या योजनेत दाम्पत्याचा (Spouse) समावेश राहील त्यासाठी कर्मचाऱ्याला १५ % अधिक हप्त्याची रक्कम भरावी लागेल.
५) विमा पॉलिसी उतरविताना वैद्यकीय तपासणीचे बंधन नाही.
६) या पॉलिसी अंतर्गत एड्स, आत्महत्या इत्यादी गंभीर आजार वगळून इतर सर्व आजारांचा समावेश राहील.

**फायदे :**

१) विमा कंपनीने नामनिर्देशित केलेल्या दवाखान्यातून रु. २,००,०००/- खर्चाइतके मोफत वैद्यकीय उपचार घेता येतील.
२) विमा हप्ता रकमेवर आयकर सवलत.
३) विमा उतरविते वेळी कर्मचाऱ्यास असलेल्या आजारांचा (Pre-existing diseases) समावेश या योजना अंतर्गत उपचारासाठी अंतर्भूत राहील.

कर्मचाऱ्याला या योजने अंतर्गत रु. २,००,०००/- पर्यंत वैद्यकीय खर्चाची रक्कम मिळेल त्यापेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सर्व साधारण आदेश क्र. २० दि. १७/०७/१९६३ नुसा अनुज्ञेय राहील.

वरील सर्व विमा योजना या "ऐच्छिक" असल्याने जे कर्मचारी सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छित नाहीत अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचा लेखी नकार संबंधित नियंत्रण अधिकाऱ्याकडे दि.१५/०४/२००८ पर्यंत सादर करावा. असे असले तरी विमा उतरविणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ५० हजारापेक्षा कमी असेल तर विम्या हप्त्याची रक्कम वाढण्याची शक्यता आहे. तसेच नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा योजना अंतर्गत समाविष्ट करुन घेण्यासाठी विचार केला जाणार नाही. तथापि, त्यांना मंडळाचा सामान्य आदेश क्र. २० (पी) च्या अंतर्भूत सवलती व कामावर असताना अपघात झाल्यास कामगार नुकसानभरपाई कायदा, १९२३ मधील तरतुदी लागू राहतील.

महावितरण कंपनीतील सर्व अधीक्षक अभियंता व तत्सम अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, वरील परिपत्रक त्यांच्या अधिकारक्षेत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व लेखी नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या या कार्यालयास दि.१९/०४/२००८ पर्यंत कळवावी. जेणेकरुन या प्रस्तावित योजना लागू करण्याविषयी कंपनीला निर्णय घेणे सुकर होईल.

राहुल गोवर्धन

कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रती :

सर्व मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी

प्रत रवाना :

१) उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, औरंगाबाद परिमंडळ / अमरावती परिमंडळ, अकोला/ नाशिक / नागपूर / नागपूर शहर / लातूर / कोल्हापूर / कल्याण / कोंकण परिमंडळ, रत्नागिरी / भांडूप

२) कामगार अधिकारी, जळगांव / सोलापूर / अमरावती / नांदेड / वर्धा / रत्नागिरी

E:\Backup Of Meena\D Drive\pension\kamchari gat vima yojana.doc